


WWJMRD 2019; 5(9): 43-44
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''सुवार्ता आणि देवाची महिमा''

**विश्वास गोरखनाथ वळवी**

**Abstract**
The result of Christian literature is everlasting and thus glorifies God. Christian literature is a means of spreading the gospel. History provides a graph of written and unwritten history. What was the purpose of the Christian missionaries who composed most of the Christian literature in the Middle Ages? To preach the gospel.
In India, most Christian literature was produced in Marathi. Father Thomas Stephens composed the Christ Purana and it was from here that Christian literature gained prominence and the common people started coming to Jesus. Later, many Christian missionaries in Telugu, Gujarati, Kannada, Hindi, English, Bengali, etc. Christian literature was created. As a result, it became easier to preach the message of Christ.

**Keywords:** Christ, Gospel, Christian, Christians, Holy Spirit, Missionaries, Literature, Evangelism, Bible, Preaching

**प्रस्तावना:**
ख्रिस्ती साहित्याच्या परिणाम हा सार्वकालिक आहे आणि त्याद्वारे देवाची महिमा होते.ख्रिस्ती साहित्य सुवार्ता प्रचार करण्याचे माध्यम आहे.इतिहासामध्ये लिखित आणि अलिखित इतिहासाचा आलेख मांडला जातो.बायबलची निर्मिती झाल्यानंतर आपण पाहतो अनेक ख्रिस्ती साहित्याची रचना पहिल्या शतकापासून होऊ लागली.देवाने दहा आज्ञा दगडावर कोरून दिल्या म्हणजे एका प्रकारे लिहून दिल्या.माध्ययुगीन कालखंडात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी सर्वात जास्त ख्रिस्ती साहित्याची रचना केली उद्देश काय होता.?सुवार्ता प्रचार करणे.
मत्तयशुभवर्तमान २८:-१९-२० वचने ही सुवार्ताप्रचार करण्यासाठीची ख्रिस्ताकडून दिलेली सर्वोच महान आज्ञा आहे.त्यात लिहिले आहे."तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा.त्यांचा पिता,पुत्र आणि पवित्रात्म्याच्या नांवाने बाप्तिस्मा करा. ज्या आज्ञा मी तुम्हांला दिल्या आहेत, त्या सर्व त्यांना पाळावयास शिकवा आणि पहा,युगाच्या समाप्तीपर्यंत,जोपर्यंत जगाचा अंत होत नाही,मी तुमच्याबरोबर आहे." शुभवर्तमाने ही ख्रिस्ताची चरित्रे आहे.आणि हीच चरित्रे सुवार्ता प्रचार करण्याची मुख्य आधारस्थाने आहे.धर्मसुधारणा चळवळ नंतर मिशनरी चळवळ वाढली आणि बायबलचे अनेक स्थानिक भाषेत अनुवाद झाले,ट्रॅक छापल्या गेल्या,पुस्तके लिहिली गेली,ऑडिया तयार करण्यात आल्या,ग्रंथकोष,शब्दकोष,निर्माण करण्यात आले.त्यामुळे सुवार्ताप्रचाराला गती प्राप्त झाली.आणि अनेक राष्ट्रातील लोकांनी ख्रिस्ताचा स्वीकार करू लागली.
भारतात मराठी भाषेत सर्वात जास्त ख्रिस्ती साहित्याची निर्मिती झाली.फादर थॉमस स्टीफन्स याने ख्रिस्तपूराणाची रचना केली आणि येथूनच ख्रिस्ती साहित्याला उंची प्राप्त होऊन सामान्य लोक ख्रिस्ताकडे येऊ लागले.पुढे,तेलगू,गुजराती,कन्नड,हिंदी,इंग्रजी, बंगाली,इत्यादी भाषेत अनेक ख्रिस्ती मिशनरी यांनी ख्रिस्ती साहित्याची निर्मिती केली.परिणामतः ख्रिस्ताचा संदेश देणे सोपे झाले.लोकांना त्याच्याच भाषेत ख्रिस्त जाणून घ्यायला मिशनरींनी एक नवा मंच उभा करून दिला.सध्या आधुनिक साहित्यात ख्रिस्ती साहित्य हे नगण्य स्वरूपात प्रकाशित होत असले. तरी मिशनऱ्यांच्या साहित्यप्रेरणेने अनेक लोक सुवार्ता प्रचार करण्यात सरसावले आहे यात दुमत नाही.मध्ययुगीन कालखंडात स्थानिक भाषेत ख्रिस्ती साहित्याची निर्मिती झाल्यामुळे मिशनऱ्यांच्या सुवार्ता प्रचार करण्याच्या निम्मा मार्ग मोकळा झाला होता.लोकांशी संवाद करणे सोपे झाले होते.त्यामुळे त्यांनी आपले सर्वस्व वेचून ख्रिस्ताचा संदेश जनसामान्य लोकांपर्यंत पोहचवला.सध्या ख्रिस्ती समाजात वाचक वर्ग कमी असला तरी गेल्या

अनेक वर्षांपासून मराठी ख्रिस्ती साहित्य परिषद आपले साहित्याचे कार्य करून ख्रिस्ती लोकांत ख्रिस्ती साहित्याप्रति जागृती आणण्याचा प्रयत्न करीत आहे.की लोकांनी ख्रिस्ती साहित्य वाचून सुवार्ता प्रचाराला प्रतिसाद द्यावा आणि ख्रिस्ताचा संदेश घरोघरी जावा.

सध्या कॉरोनाची परिस्थिती असल्याकारणाने संपूर्ण जगात वेगवेगळ्या पध्दतीने लॉकडॉन करण्यात येत आहे.गेल्या दीड वर्षापासून हा कारभार सुरू आहे.त्यामुळे आज ख्रिस्ती सेमिनार,रविवारची आराधना,आणि प्रार्थना सभा,विनंती इत्यादी ऑनलाईन पद्धतीने केल्या जात आहे.म्हणजे ऑनलाईन पद्धतीने ख्रिस्ताचा संदेश/उपदेश लोकांपर्यंत पोहचविला जात आहे.लिखित साहित्या सोबतच श्रवणध्वनी,भ्रमणध्वनी,ऑडिया,व्हिडीओ इत्यादी पद्धतीने ख्रिस्ताचा प्रचार केला जात आहे.ऑनलाईन पद्धत ही सुवार्ता प्रचार करण्याची पर्यायवाची संधी अथवा पद्धत आहे.भविष्यात ख्रिस्ती लोकांना पुन्हा चर्चचा मंचावर ख्रिस्ती साहित्याच्या म्हणजे पवित्रशास्त्र आणि इतर ख्रिस्ती साहित्याच्या आधार घेऊन ख्रिस्ताचा उपदेश देणे क्रमप्राप्त आहे.त्यामुळे ख्रिस्ती लोकांनी ऑनलाईन पद्धतीचे अतिसेवन करून आध्यात्मिक अतिक्रमणाला बळी पडू नये.सुवार्ता प्रचार करण्याचा मुख्य आधार बायबल आहे आणि त्यानंतर पवित्र आत्म्याच्या साहाय्याने ज्या ख्रिस्ती लेखकांनी ख्रिस्ती साहित्याची निर्मिती केलेली आहे असे ख्रिस्ती साहित्य.आधुनिक साहित्यात ख्रिस्ती साहित्य आणि त्या साहित्याच्या माध्यमातून ख्रिस्त जणसामान्य माणसांकडे कसे पोहचवता येईल यावर मनन चिंतन करणे सध्या अत्यंत गरजेचे आहे.फक्त ख्रिस्ती साहित्य निर्माण करीत जाणे म्हणजे ख्रिस्ताचा उपदेश जनसामान्य माणसांकडे पोहचत आहे.असे गृहीत धरून चालणे म्हणजे ख्रिस्ती साहित्यिकांचा मूर्खपणाच ठरेल.

**संदर्भसूची:-**

1. मत्तयशुभवर्तमान २८:-१९-२०.नवा करार.पवित्रशास्त्र